# आयुर्विमा स्थिती आणि आव्हाने

**डॉ. संजय हिंदुराव शिंदे**

*सरदार बाबासाहेब माने महाविद्यालय, रहिमतपूर*

*ता. कोरेगाव जिल्हा. सातारा*

मानवी जीवन अनेक संकटानी भरलेले आहे. काही संकट येणार याची कल्पना येते तर काही संकट अपघाती असतात. त्यामुळे मानवी जीवन अस्थिर झालेले पहावयास मिळते. आज जागतिकीकरण, खाजगीकरण, उदारिकरणाच्या या आधुनिक आर्थिक स्पर्धेच्या युगात व्यक्तीने आपले दैनंदिन व्यवहार, जीवनशैली, आरोग्य उत्तम ठेवले हे आव्हान निर्माण झाले आहे. त्यामुळे व्यक्ती व त्याचे कुटुंब यांच्या भविष्याची तरतूद करणे क्रमप्राप्त ठरले आहे.

व्यक्ती जीवनात भूकंप, ज्वालामुखी, वादळ, महापूर, वीज पडून मृत्यू अतिपाऊस, दरडी कोसळणे, अशी नैसर्गिक संकट तर वहान अपघात, आग स्पोट, काम करताना अपघात, बॉम्बास्पोटात मृत्यू, जखमी एखाद्या किंवा अनेक अवयव निकामी होणे, हृदयरोग, मधूमेह, कॅन्सर अशी मानव निर्मित संकट ही आकस्मित येतात परिणामी व्यक्ती हतबल होतो. यासाठी समाजातील सर्व थरातील व्यक्ती, व्यापारी व व्यावसायिक याबाबत अनपेक्षितपणे उद्‌भवणाऱ्या विशिष्ट स्वरुपाच्या कारणामुळे किंवा एखादया घटनेमुळे मालमत्तेची होणारी हानी अथवा व्यक्तीस येणारे अपंगत्व अथवा मृत्यू व त्यामुळे कुटुंबावर होणाऱ्या दुरगामी आर्थिक दुष्परिणामाची भरपाई करण्याच्या दृष्टिने सामाजिक सहकार्याचा एक मार्ग म्हणजे विमा होय. विमा हा एक सामाजिक सहकार्याचा उत्कृष्ट अविष्कार आहे.

थोडक्यात व्यक्तीची सुरक्षा व नुकसान भरपाईची हामी, आयुर्विमा देते. 'आयुर्विमा' हा विम्याचा असा एक करार आहे की, याद्वारे विमेवार किंवा विमा घेणारी व्यक्ती विमा कंपनीस विम्याचे ठराविक हप्ते देते त्या हप्त्याचा बदल्यास विमा कंपनी विमा करारात नमूद केलेली रक्कम कराराची मुदत संपताच विमेदार हयात असल्यास विमेदारास आणि कराराची मुदत संपण्यापूर्वी विमेदारास मृत्यु आल्यास त्याच्या कायदेशीर वारसदाराला किंवा विमापत्र ज्या व्यक्तीच्या नावाने केलेले असेल त्या व्यक्तीस विम्याची रक्कम दिली जाते.

यावरुन स्पष्ट होते की भविष्यातील तरतूद म्हणून व्यक्तीने काही रक्कम गुंतवली पाहीजे तरच सुरक्षा किंबहुना आर्थिक संरक्षण लाभते. तेव्हा आर्थिक क्रिया व सामाजिक दृष्टिकोणाशी निगडीत आहे. भारताची लोकसंख्या १२५ कोटी पेक्षा आधिक आहे. या लोकसंख्येच्या ५०% लोकांनी विमा उतरविलेला नाही. हे अनेक विमा कंपनीच्या अहवालावरुन स्पष्ट होते. आर्थिक बचत हाच महत्वाचा घटक असल्याने विमासारख्या सामाजिक सुरक्षा प्रदान करणाऱ्या योजनेपासून अनेक लोक वंचित राहिले आहेत. याच्या महत्वाच्या कारणापैकी भारतीय आर्थिक स्थिती जाणून घेणे महत्वाचे वाटते.

भारतात उत्पन्नाची पराकोटीची विषमता आहे. देशाच्या एकुण उत्पादनाच्या ५०% उत्पन्न केवळ २०% लोकांनी तर, जे तळागाळातले आहेत त्यांच्या वाटयाला केवळ ७% उत्पन्न येते. शिवाय दिवसे दिवस वाढत जाणारी महागाई यामुळे कुटुंबाचा उदरनिर्वाह योग्य पद्धतीने करणे हा ७०% लोकांच्या पुढे आव्हानात्मक प्रश्न उभा आहे. परिणामी बचत करणेस शिल्लख रक्कमेचा अभाव असल्याने जवळजवळ ५०% लोक विम्या विना वंचित आहेत.

सदर शोध निबंधात मध्यमवर्ग व दारिद्रय रेषे खालील लोकांनी आयुर्विमाचा स्विकार कितपत केला आहे व सर्व सामान्य लोकांची स्थिती व विमा विषयक आव्हाने याबाबत समाजशास्त्रीय दृष्टिकोणातून या प्रश्नावर प्रकाश टाकला आहे.

**उद्दिष्टये-**

१) आयुर्विमा आणि सामान्य माणूस यांचा संबध अभ्यासणे

२) आयुर्विमा बाबत सर्व सामान्य लोकांची मत जाणून घेणे

३) आयुर्विमा बाबतच्या समस्या जाणून घेणे

४) आयुर्विमाचे महत्व बिंबवणे

**गृहितके-**

१) बहुसंख्य लोक आयुर्विमा योजनापासून वंचित आहेत

२) बहुसंख्य लोकांना आयुर्विमाचे महत्व समजलेले नाही

३) दारिद्रयामुळे आयुर्विमा योजनापासून लोक दूर आहेत

४) शिक्षणाचा अभाव दिसून येतो

५) सामाजिक सुरक्षिततेबाबत लोक दक्ष नाहीत

**संशोधन पद्धती-**

सदर संशोधनासाठी प्राथमिक स्तोत पद्धतीने सामाजिक सर्वेक्षण या तंत्रचा वापर केला आहे. सदर शोध निबंधासाठी, सातारा जिल्हयातील वेगवेगळया व्यवसाय, मंजूरी करणाऱ्या पेंटर, गवंडी, सुतार, रिक्षा ड्रायव्हर, टेम्पोड्रायव्हर, नाष्टा सेंटरवरील कामगार, अशा सहा प्रकारच्या कामगारातील प्रत्येकी १० अशा ६० कामगारांची सहेतूक नमुना निवड पद्धतीने निवेदकांची मुलाखत घेऊन माहितीचे संकलन व विश्लेषण केले आहे व दुय्यम स्तोत पद्धतीने विविध ग्रंथ, मासिके, अहवाल, वृत्तपत्र यांचा वापर करुन माहिती संकलित केली आहे.

**माहितीचे विश्लेषण-**

प्रत्येक व्यक्तीने आयुर्विमा उतरविला पाहीजे ही आजची अत्यंत महत्वाची गरज आहे. पण भारतीय लोकांच्या उत्पन्नात विषमता मोठया प्रमाणावर आल्याने स्वत:साठी किंवा कुटुंबासाठी बचत करणे त्याला अशक्य होते. परिणामी आयुर्विमा या सामाजिक सुरक्षा योजनापासून ४०% लोक वंचित आहेत.

**आयुर्विमा बाबत माहिती-**

आयुर्विमा ही सामाजिक सुरक्षितता देणारी कल्याणकारी योजना आहे या योजनाची माहिती लोकांना कितपत आहे. याची माहिती घेतली असता खाली दर्शविलेली स्थिती निदर्शनास आली.

आयुर्विमा योजनाची माहिती आहे की नाही याची माहिती दर्शविणारा तक्ता

**तक्ता नं. १**

| अ.क्र. | विमा बाबत माहिती | उत्तरदात्याचे संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | आयुर्विमा योजनाची माहिती आहे | १० | १६.६६ |
| २. | आयुर्विमा योजनाची माहिती नाही | ५० | ८३.३५ |
| | एकुण | ६० | १०० |

वरील तक्त्यावरुन असे दिसून येते की, १६.६४% लोकांना आयुर्विमा योजनेबाबत माहिती आहे तर ८३.३४% लोकांना आयुर्विमा योजनेबाबत आज ही माहिती नाही.

यावरुन हे स्पष्ट होते की बहुसंख्य लोकांना आयुर्विमा ही सामाजिक सुरक्षा प्रधान करणारी योजना आहे याची माहितीच नाही.

**आयुर्विमा उतरविण्याविषक अडचणी-**

आयुर्विमा का उतरविला नाही याबाबत माहिती घेतली असता निवेदकानी खाली दर्शविलेले मत व्यक्त केली आहेत.

आयुर्विमा उतरिविला का उतरविला नाही याविषयी माहिती दर्शविणारा तक्ता

**तक्ता नं. - २**

| अ.क्र. | अडचणी | निवेदकांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | पैशाचा अभाव | ३५ | ५८.३४ |
| २. | माहितीची कमतरता | १४ | २३.३३ |
| ३. | इच्छा नाही | ०४ | ६.६६ |
| ४. | सततचे आजारपण व कौटुंबिक अडचणी | | |
| | एकुण | ६० | १०० |

वरील तक्त्यावरुन असे निदर्शनास येते की, विमा आपण स्वतःचा उत्तरविला आहे का याबाबत माहिती करु असे दिसून येते. ५८% लोकांना पैशाचा अभाव असल्याने विमा रक्कमेचा हप्ता भरणे शक्य नाही विमा हप्त्याऐवढी रक्कम शिल्लक रहात नाही असे सांगितले आहे. तसेच आयुर्विमा ही स्वत: व कुटुंबाच्या आर्थिक सुरक्षा मिळवून देणारी कल्याणकारी योजना आहे याबाबत पुरेशी माहिती नाही अशा निवेदकांची संख्या २३.३३% आहे. विमा स्वतःचा उत्तरवायचा नाही अशा मताचे ६.६६% लोक आहेत तर सततचे कुटुंबातील आजार पण असल्याने व उत्पन्न अल्प असल्याने आयुर्विमा उत्तरविला नाही असे ११.६७% निवेदक आहे.

वरील माहितीवरुन असे दिसून येते की, आयुर्विमा योजनेची माहिती तळागळात पोहचवली पाहीजे अन्यथा या कल्याणकारी योजनेच्या लाभापासून बहुसंख्य लोक वंचित राहतील.

**शिक्षणाचे प्रमाण-**

आयुर्विमा उत्तरविणे याचा आर्थिक व शिक्षणाशी संबध आहे. शिक्षित व्यक्तीला भविष्याची तरतूद करण्यास अधिक प्रमाणात मार्गदर्शनाची गरज नसते. पण निरक्षर अज्ञान व अल्पशिक्षित यांना आयुर्विम्याचे जीवनातील महत्व पटवून देणे गरजेचे आहे. या दृष्टीने सर्व सामान्य निवेदकांच्या शिक्षणाचे प्रमाण पाहणे गरजेचे आहे.

निवेदकांच्या शिक्षणाचे प्रमाण दर्शविणारा तक्ता

**तक्ता नं. ३**

| अ.क्र. | शिक्षणाचा स्तर | निवेदकांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | १०वी ते १२वी | ०८ | १३.३४ |
| २. | ७वी ते ९ वी | ४३ | ७१.६७ |
| ३. | १ली ते ६वी | ०५ | ८.३३ |
| ४. | निरक्षर | ०४ | ६.६६ |
| | एकुण | ६० | १०० |

वरील सारणीवरुन असे दिसून येते की, १०वी ते १२वी पर्यत शिक्षण घेतलेल्या निवेदकाचे शेकडा प्रमाण १३.३४% आहे या स्तरातील निवेदकांना विम्याचे महत्व माहित आहे. ७ वी ते ९वी पर्यत शिक्षण घेतलेल्या निवेदकांचे शेकडा प्रमाण ७१.६७% आहे

ली ते ६वी पर्यत शिक्षण घेतलेल्या निवेदकांचे शेकडा प्रमाण- ८.३३% आहे तर निरक्षण असलेल्या निवेदकांचे प्रमाण ६.६६% आहे.

यावरुन असे निदर्शनास येते की बहुसंख्य निवेदकांना आयुर्विमाचे आजच्या स्थितीत किती महत्व आहे याची माहिती नाही. त्यांना या योजनेत सहभागी करुन घेणेसाठी जागृत करणे गरजेचे आहे.

**मासिक उत्पन्न -**

आयुर्विमा हे आर्थिक बचतीचे सुरक्षित साधण आहे. व्यक्ती येणारी आकस्मित संकट व भविष्यातील आर्थिक तरतूद म्हणून उत्पन्नातील काही अंश हा विमा स्वरुपात बचत ठेवणे आजच्या स्पर्धेच्या युगात गरजेचे आहे कारण दिवसे दिवस वाढत जाणारी महागाई व महाग होत चालेल्या आरोग्य सेवा या समस्येना समर्थपणे तोंड देण्यासाठी आयुर्विमा उतरविणे गरजेचे आहे. निवेदकांच्या आर्थिक परिस्थितीचा आढावा घेणे महत्वाचे वाटते कारण आर्थिक स्थितीवरुन आयुर्विमा योजना किमान तळागळात पोहचली जावू शकेल याची जाणिव होईल.

निवेदकांच मासिक उत्पन्न दर्शविणारा तक्ता

तक्ता नं. ४

| अ.क्र. | उत्पन्न (रुपयात) | निवेदकांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | ८००० ते १०,००० | ०३ | ५.०० |
| २. | ५००० ते ७५०० | ११ | १८.३३ |
| ३. | २००० ते ४५०० | २८ | ४६.६७ |
| ४. | १००० ते १९०० | १८ | ३०.०० |
| | एकुण | ६० | १०० |

वरील तक्त्यावरुन असे निर्दशनास येते की, ८००० ते १०,०००/- मासिक उत्पन्न असलेल्या निवेदकाचे शेकडा प्रमाण ५% आहे ज्यांच उत्पन्न ५००० ते ७५०० आहे त्यांचे शेकडा प्रमाण १८.३३% आहे. तर २००० ते ४५०० रुपये उत्पन्न असणाऱ्या निवेदकांचे शेकडा प्रमाण ४६.६७% आहे व १००० ते १९०० रुपये मासिक उत्पन्न असणाऱ्या निवेदकांचे शेकडा प्रमाण ३०% आहे.

यावरुन असे दिसून येते की बहुसंख्य लोकांचे मासिक उत्पन्न अल्प आहे सदर उत्पन्नास कुटुंबाचा मासिक खर्च नीट भागवता येत नसल्याने त्यांना विमा सारख्या योजनेत विमा हप्ता रक्कम भरणे शक्य होत नाही.

**इतर आव्हाने-**

आयुर्विमा धारकांच्या संख्येत मोठया प्रमाणात वाढ न होण्याच्या कारणामध्ये विविध परिस्थिती कारणीभूत असून त्यापैकी काही महत्वाच्या कारणांचा आढावा पुढील प्रमाणे-

**१) साक्षरतेचा अभावा -**

२०११ च्या साक्षरता अहवालानुसार भारतात ७५% साक्षरता आहे. पण साक्षर मानल्या गेलेल्या लोकांपैकी २०% लोकांना फक्त स्वतःचे नाव व सही करावयास येते, नीट वाचताही येत नाही. साहजिकच अज्ञान व निरक्षरता मोठया प्रमाणावर असल्याने अज्ञान व निरक्षर लोक दैवावर विश्वास ठेवून आहे त्या दारिद्रय परिस्थितीत राहतात भविष्यातील येणाऱ्या अडचणीबाबत जागृत नसतात त्यामुळे विमा या सामाजिक सुरक्षा योजनेपासून मोठयाप्रमाणावर वंचित आहेत.

२) **दारिद्रयाचे दुष्टचक्र -**

दारिद्रयाच्या दुष्टचक्रात अडकलेल्या लोकांना उत्पन्नाची हमी देणारी साधणे नसतात. उत्पन्न मिळविण्यासाठी लागणारे प्रशिक्षण

नसते. दैनंदिन रोजगार ही उपलब्ध होत नाही परिणामी दारिद्र्याचे दुष्टचक्र भेदता येत नाही त्यामुळे बचत करण्याची क्षमता कमी रहाते परिणामी विमा योजनेचा लाभ ते घेऊ शकत नाहीत.

३) **आयुर्विमा योजना माहितीचा अभाव -**

आयुर्विमा योजनाबाबतची माहिती तळागाळातील लोकांच्यापर्यंत पोहचलेली नाही शिवाय विमा उतरविणाऱ्या अनेक कंपनी बाजारपेठेत आहेत पण सर्वसामान्य दारिद्रय लोकांना याविकास योजनेचा कोणकोणत्या प्रकारे लाभ होऊ शकतो व भविष्यात वृद्धापकाळात आर्थिक पुंजी उपयोगी ठरते याचे महत्व अद्याप पटलेले नाही अशा अनेक कारणामुळे तसेच विम्याचे अनेक प्रकार आहेत त्यांचा दारिद्रय रेषेखालील व्यक्तीलाही लाभ घेता येतो. याची माहिती तळागाळात पोहचत नाही त्यामुळे विमा योजनापासून अनेक लोक वंचित आहेत.

४) **प्रगत लोकांबाबत अविश्वास -**

विमा व्यवसाय करणारे बहुसंख्य लोक शिक्षित असतात असे विमा एजंट व अधिकारी वर्ग स्वत:ला व विमा कंपनीस अधिक लाभ होईल असा विमा प्रकारची पॉलिसी सर्व सामान्य लोकांना देतात अशा विमा पॉलिसीचा लाभांश तटपुंजा असतो. शिवाय अनेक विमा कंपन्या शिक्षित लोकांच्या आर्थिक घोटाळयामुळे बंद पडल्या आहेत. अशा विमा कंपन्यात गोरगरिबांनी गुंतलेला पैसा बुडाला हे सर्वज्ञात आहे अशा प्रकारे सामान्य लोकांची फसवणूक होते या भिती पोटी लोक आयुर्विमा पासून दूर राहिले आहेत.

५) **गुंतवणूक लाभ अनिश्चित -** आयुर्विमा कंपनी आपल्या अनेक प्रकारच्या पॉलिसीची रक्कम शेअर बाजारात गुंतवतात. शेअर बाजारातील चढउतारानुसार विमाधारकाला उत्तरलेल्या विमा पॉलिसीची रक्कम शेअरबाजारातील दराप्रमाणे भेटते हा भाव अत्यंत कमी असतो. साहजिकच गुंतवलेली रक्कमचे हप्त व्यक्ती किमान १५ ते २५ वर्षे सतत महिन्याला भरत असतात. पण मुदतीनंतर मिळणारा लाभ हा अनिश्चित असतो त्यामुळे लोक आयुर्विमाकडे पाठ फिरवत आहेत.

६) **नोकरशही यंत्रणेचा नकारात्मक दृष्टिकोण -**

विमाधारक हा लाभ अधिक प्रमाणात व मुदत संपल्यावर ताबडतोब मिळेल या आशेने गुंतवणुक दर महिन्याला असे किमान १५ ते २५ वर्षे करत असतो २५ वर्षानंतर विमा रक्कम ताबडतोब मिळावी यासाठी LIC कार्यालयात अनेकदा खेटे मारावे लागतात विविध कागदपत्रे पुरावा म्हणून सादर करावा लागतो त्यानंतर किमान २० पुढच्या तारखेला रक्कम मिळण्याचा चेक दिला जातो. याप्रकारच्या नोकरशाहीच्या नकारात्मक दृष्टिकोणामुळे लोक आयुर्विमाकडे आर्कर्षिले जात नाहीत.

## निष्कर्ष

भारतात साक्षरतेचा अभाव असल्याने बचत करणे व सामाजिक सुरक्षितता याबाबत लोक आजही जागृक नाहीत. सामाजिक परिस्थितीती पहाता विषमाधिष्ठीत आर्थिक स्तर रचना सर्वत्र पहावयास मिळते. एका बाजूला श्रीमंत वर्ग तर दुसऱ्या बाजूला मध्यमवर्ग व दारिद्रय वर्ग यांना जीवन जगण्यासाठी दररोज संघर्ष करावा लागतो. वाढती महागाई वाढणारे सर्व सेवाचे दर व वाढती बेरोजगारी कायम नोकरीची शाश्वती नाही. मजूरीतून मिळणारे अल्पउत्पन्न व वाढत्या गरजा याचा मेळ बसत नाही परिणामी पैशा अभावी गोरगरीब मध्यमवर्ग यांना विमायोजनांचा लाभ घेता येत नाही. आयुर्विमा हा काय प्रकार आहे याची कल्पनाच लाखो लोकांना नाही त्यामुळे आयुर्विमा लोकांच्या जीवनात कोण कोणत्या प्रसंगी उपयोग होऊ शकतो यांची माहिती त्यांच्या पर्यत पोहचवली गेली नाही.

प्रगत लोक विम्याचे विविध प्रकार घेऊन जनते समोर जात आधिक आर्थिक लाभ मिळणार याची हामी देतात लोक त्यांच्या आव्हानाला भूलतात किमान १५ ते २५ वर्षे पैसे गुंतवतात पण गुंतवलेला पैसा व लाभ मिळण्यापूर्वी विमा कंपन्या आपला गाशा गुंडाळतात परिणामी गोरगरीब व मध्यम वर्गाला प्रचंड आर्थिक तोरा सहन करावा लागतो. लोक हतबल होतात सरकारही जबाबदारी घेत नाही अशा अनेक घटना सर्वज्ञात आहेत त्यामुळे विमा कंपन्या, विमा अधिकारी यांच्यावर लोक विश्वास ठेवायला राजी नाहीत एखाद्या विमा पॉलिसी मध्ये रक्कम गुंतवल्यावर निश्चित किती फायदा होऊ शकतो याची शाश्वती दिली जात नाही कारण विमा

कंपन्या लोकांचे पैसे शेअर बाजारात गुंतवतात शेअर बाजार ढासळलकी गुंतवलेली रक्कम ही विमाधारका मिळेल याची शाश्वती कोणी ही देत नाही. विमाधारक लोकांनी १५ ते २५ वर्षे रक्कम गुंतवणुक करुन मुदत संपल्यावर विमा रक्कम घेण्यासाठी विमाधारकाला विमाकार्यालयात अनेक चक्रा मारव्या लागतात विविध प्रकारची कागदपत्रे पुरावे म्हणून सादर करावी लागतात. तरच विम्याची रक्कम मिळते व तीही चेकच्या स्वरुपात त्याचेकची रक्कम २० ते २५ दिवसानी मिळते.

अशा विविध कारणामुळे विमा विषयक लोकांच्या मनात अनास्था निर्माण झाली आहे. तेव्हा आयुर्विमा कंपनीने लोकांना आर्थिक सुरक्षितता बरोबरच आकस्मित अपघात, आजारपण, गृहबांधणी, मुलांचे उच्चशिक्षण अशा अनेक महत्वाच्या प्रसंगी आर्थिक मदत करण्यास आयुर्विमा कंपनी तयार असते याचे महत्व तळागाळातील लोकांना पटवून दिले जाते पाहीजे. या योजनेत सर्व महिला, गरीब, मध्यमवर्गाचा, दारिद्रय वर्गाचा सहभाग वाढेल यासाठी काही सक्तीच्या विमा योजना ज्या खात्रीपूर्वक लाभ देतील अशा योजनांचे नियोजन व कडक अमलबजावणी करावी तरच आर्थिक बचतीची सवय व उज्वल भारताचे स्वप्न सत्यात उतरेल.

**संदर्भ ग्रंथ**


१) मानकर सुधाकर, डॉ. जोशी जे.सी. - विमाशास्त्र (२०११) फडके प्रकाशन, कोल्हापूर

२) Khan Arif - Insurance

३) Insurance institute of India - Life Insurance

४) Taneja, Aruna and Kumar Naredra (२००४) -Insurance of India - challenges and opportunities (The Insurance Times)

५) Annual Report (२०१५) - LIC of India

६) Annual Report (२०१६) - LIC of India

७) Insurance Regulatory and Development AIC १९९९

८) Licensing of Insurance Agent Regulations